ePaper

गुड न्यूज : आठव्या वेतन आयोगामुळे सरकारी कर्मचाऱ्यांची लॉटरी!

॥ वर्ष - 8 ।अंक -187 ॥ UDYAM-MH-26-0158827॥

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ शुक्रवार, दिनांक 17 जानेवारी 2025 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews



आतील पानांत


- करूण नायरचं वादळ कायम!
- दरोडेखोराने १ कोटी रुपये मागितले
- 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी!
- स्वराज्य संस्थांवर महायुतीचे लक्ष!


## ड्रग्ज पुरवठादारांवर पोलिसांची नजर

# पुणे गुन्हेगारीचा अड्डा बनतयं?

### येरवड्यातून तब्बल 22 लाखांचे मॅफेड्रॉन जप्त; NDPS नुसार गुन्हा दाखल

। पुणे । महाईन्यूज

**येरवडा परिसरात पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने येरवड्यात छापा कारवाईकरून मोठा ड्रग्जसाठा पकडला. पुणे पोलिसांनी तब्बल एकाकडून २२ लाखांचे मॅफेड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ पकडला आहे. दरम्यान, शहर ड्रग्जमुक्त करण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असताना इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज पकडल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.**



अहमद वाहिद खान (वय ४५, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) असे पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अतिरीक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली आहे. शहर ड्रग्जमुक्त करण्यासाठी पोलीस प्रयत्न करत आहेत. परंतु, ड्रग्ज डिलर छुप्या पद्धतीने त्याची विक्री करत आहेत. तर दुसरीकडे पिणाऱ्यांना ड्रग्ज सहजरित्या उपलब्ध होत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, ड्रग्ज पुरवठादारांवर पोलिसांकडून नजर ठेवली जात आहे. यादरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथक दोन येरवडा परिसरात गस्त घालत होते. तेव्हा पोलीस अंमलदार आझाद पाटील यांना अहमद याच्याबाबत माहिती मिळाली. त्या माहितीची खातरजमा करण्यात आली. त्यानूसार, पथकाने छापा कारवाईकरून अहमद खान याला पकडले. त्याच्याकडे चौकशीकरून पोलिसांनी तब्बल २२ लाखांचे ११० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले आहे. पोलीस त्याच्याकडे आता हे एमडी कोठून आणले आणि पुण्यात तो कोणाला विक्री करत होता, याबाबत सखोल तपास करत आहेत. पुण्याच्या मध्यभागातून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पुन्हा एकदा सराईत गुन्हेगाराकडून 'ड्रग्ज'साठा पकडला आहे. १४ लाख ६० हजार रुपयांचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ पकडला असून, त्यासोबतच एक पिस्तूल आणि दोन काडतूसे जप्त केली आहेत. धक्कादायक म्हणजे, सराईताने "गेम" करण्यासाठी पिस्तूल बाळगल्याची माहिती समोर आली आहे.

बॉबी भागवत सुरवसे (वय २८, रा. गजराज हेल्थ क्लबजवळ, सर्वे नं. १२, लक्ष्मीनगर येरवडा) आणि तोसिम ऊफ लडडु रहिम खान (वय ३२, रा. १२८२ दर्गारोड, कसबा पेठ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अप्पर आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय कुंभार, सहाय्यक पोलीस फौजदार सुनिल पवार, सुरेंद्र जगदाळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

#### पोलिसांचा वॉच कायम

शहरात दोन मोठी ड्रग्जप्रकरण समोर आल्यानंतर पुणे पोलिसांकडून ड्रग्जडिलर, पेडलर यांच्यावर नजर ठेवली जात आहे. त्यानंतरही शहरात छुप्या पद्धतीने ड्रग्जची विक्री होत आहे. तर, आता थर्टीफस्टच्या पार्श्वभूमीवर देखील पोलीस सतर्क झाले आहेत. यादरम्यान, गुन्हे शाखेचे अंमली पदार्थ विरोधी पथक दोन व खंडणी विरोधी पथक दोनचे अधिकारी व पथक गस्त घालत होते. तेव्हा पथकाला माहिती मिळाली की, बॉबी सुरवसे आणि तोसिम खान यांच्याबाबत माहिती मिळाली.

## तंत्रज्ञानाच्या काळात अध्यात्माची गरज-स्वामी स्वरूपानंद

### निगडीत होणार सात दिवशीय संतांच्या अभंगावर व्याख्यानमाला

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**"सध्याच्या काळ तंत्रज्ञानाचा असून यामध्ये तरूण, मध्यमवर्गीय, ज्येष्ठांसह सर्वांनाच अध्यात्माची नितांत आवश्यकता आहे. प्रत्येकाने समाजाला समोर ठेवून आत्मविश्वासाने मार्गक्रमण केले पाहिजे", असे प्रतिपादन श्रुतिसागर आश्रमाचे संस्थापक स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी बुधवारी (दि.15) चिंचवड येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केले.**





श्रुतिसागर आश्रमाच्या वतीने निगडी, प्राधिकरणातील ज्ञानप्रबोधिनी, नवनगर विद्यालयामधील मनोहर सभागृहात संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या निर्वाणीचे बारा अभंगांवर माताजी स्वामी स्थितप्रज्ञानंद सरस्वती यांच्या सुश्राव्य व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना स्वामी स्वरूपानंद सरस्वती बोलत होते. यावेळी श्रुतिसागर आश्रमातील सदस्यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या निर्वाणीचे म्हणजे मोक्षांच्या अभंगावर दि.18 ते 24 जानेवारी या कालावधीत दररोज सायंकाळी साडेसहा ते आठ वाजता व्याख्यानमाला होणार आहे. ही व्याख्यानमाला मोफत असून जास्तीत-जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करतानाच स्वामी स्वरूपानंद सरस्वती पुढे म्हणाले, "गेल्या चार दशकांपासून अध्यात्मशास्त्राचा प्रचार व प्रसार केला जात आहे. वेदांच्यामधील अव्दैत तत्वज्ञान हे जगातील सनातन आणि सर्वोच्च तत्वज्ञान आहे.

#### मनुष्याचे जीवन सुखी व सुसह्य होऊ शकते

याच तत्वज्ञानाच्या आधारे प्रत्येक मनुष्याच्या जीवनातील नैराश्य, ताणतणाव, अनेक दुःखे यांचा निरास होऊ शकतो. मनुष्याचे जीवन सुखी व सुसह्य होऊ शकते. हे अत्यंत उच्च तत्वज्ञान जगातील सर्व तत्वज्ञानांचाच नव्हे तर धर्मांचा आणि पंथांचा देखील गाभा आहे. हे ज्ञान विज्ञाननिष्ठ लोकांना विज्ञानाच्या भाषेमध्ये व सर्वसामान्यांना त्यांच्या भाषेमध्ये उपलब्ध करून देण्याचे मुख्य काम श्रुतिसागर आश्रमाच्या वतीने निरंतर केले जाते. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकीची जाणिव ठेवून आश्रमाच्या वतीने शैक्षणिक, वैद्यकीय आणि समाजोपयोगी कार्य करण्यात येत असल्याचेही स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी सांगितले".

## 20 किलोमीटर अंतरापर्यंत 15 ते 20 वाहनांना धडक

# वेगवान कंटेनरचा थरार!

## तीन महिला जखमी, अनेक वाहनांचे नुकसान

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनर ने सुमारे वीस किलोमीटर अंतरापर्यंत पंधरा ते वीस वाहनांना धडक दिली. या धडकेत पोलिस व्हॅन चाही समावेश आहे. अपघाताची सुरुवात चाकण जवळील माणिक चौकात तीन महिलांना धडक देऊन झाली होती. जातेगाव फाटा ( तालुका शिरूर ) गावा नजिक हायवा ( मोठा ट्रक ) आडवा लावून कंटेनर थांबवण्यात यश आले.**



याबाबत अधिक माहिती अशी की चाकण शिक्रापूर रस्त्यावर दुपारी एक ते दोन च्या दरम्यान कंटेनर चालला होता तीन महिलांना धडक दिली. अपघातानंतर कंटेनर चालक पळून जात आहे, असे निदर्शनास आल्यानंतर अनेक दुचाकी व खाजगी वाहनांनी कंटेनरचा पाठलाग सुरू केला. तरीदेखील कंटेनर वेगात पुढे जातच होता, कंटेनरला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व समोरून येणाऱ्या 15 ते 20 खाजगी वाहनांना कंटेनर ने धडक देऊन नुकसान केले . शेळपिंपळगाव जवळ कंटेनर ने मागे वळून पुन्हा चाकणच्या दिशेने प्रवास सुरू केला. मात्र समोरून येणारी असंख्य वाहने पाहून कंटेनर पुन्हा वळून शिक्रापूरच्या दिशेने गेला. स्थानिक नागरिकांनी व रस्त्यावरील अनेकांनी कंटेनर थांबविण्यासाठी दगडफेक केली मात्र कंटेनर न थांबता पुढे जातच होता.

बहुळ गावानजीक पोलिसांनी आडवे लावलेले बॅरिकेट उडवून कंटेनर पुढे गेला जातेगाव फाटा ( तालुका शिरूर ) येथे हायवा गाडीचालकाने अथक प्रयत्न करून कंटेनर ला रस्त्याच्या खाली ढकलले, त्याचवेळी कंटेनर बंद पडल्याने थांबला .

कंटेनरचा पाठलाग करणाऱ्या संतप्त जमावाने कंटेनर चालकाला बेदम मारहाण केली. पोलिसांची कमुक वेळेत पोहोचल्याने पुढील अनर्थ टळला.

पोलीस व्हॅन मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक नकुल न्यामने, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रोहिदास मोरमारे व वार्डन अभिजित कदम हे किरकोळ जखमी झाले आहेत.तर चाकण नजीक माणिक चौकात दुसऱ्या वाहनाची प्रतीक्षा करणाऱ्या पोर्णिमा अंबादास गाढवे ( वय २५ भोसरी) धनश्री अंबादास गाढवे ( वय ७ ) तसेच ज्योती प्रवीण ढोले ( वय ३१, रा. बालाजी नगर चाकण या महिला गंभीर जखमी झाल्या. जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अकीब अब्दुल रजाक खान ( वय २५ रा. पलवल, हरियाणा ) या मद्यधुंद कंटेनर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन उपचारासाठी पुण्याला रवाना केले आहे.

### माणिक चौकात तीन महिलांना धडक

अपघातानंतर कंटेनर चालक पळून जात आहे, असे निदर्शनास आल्यानंतर अनेक दुचाकी व खाजगी वाहनांनी कंटेनरचा पाठलाग सुरू केला. तरीदेखील कंटेनर वेगात पुढे जातच होता, कंटेनरला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व समोरून येणाऱ्या 15 ते 20 खाजगी वाहनांना कंटेनर ने धडक देऊन नुकसान केले . शेळपिंपळगाव जवळ कंटेनर ने मागे वळून पुन्हा चाकणच्या दिशेने प्रवास सुरू केला. मात्र समोरून येणारी असंख्य वाहने पाहून कंटेनर पुन्हा वळून शिक्रापूरच्या दिशेने गेला. स्थानिक नागरिकांनी व रस्त्यावरील अनेकांनी कंटेनर थांबविण्यासाठी दगडफेक केली मात्र कंटेनर न थांबता पुढे जातच होता. बहुळ गावानजीक पोलिसांनी आडवे लावलेले बॅरिकेट उडवून कंटेनर पुढे गेला जातेगाव फाटा ( तालुका शिरूर ) येथे हायवा गाडीचालकाने अथक प्रयत्न करून कंटेनर ला रस्त्याच्या खाली ढकलले, त्याचवेळी कंटेनर बंद पडल्याने थांबला .

---

## आजी आजोबा घरातील अडगळ नसून, संस्काररूपी कळस

## संत साई हायस्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस उत्साहात साजरा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आदिनाथ नगर येथील संत साई हायस्कूल येथे आज उत्साहवर्धक वातावरणात आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला. आजी आजोबा दिवस साजरा करण्यामागचा मुळ उद्देश म्हणजे आपल्या जीवनात त्यांच्या उपस्थितीची कदर करणे आणि मुलांना त्यांच्या आजी आजोबांप्रती अधिक प्रेमळ आणि प्रेमळ बनण्यास मदत करणे. शिवाय मुले त्यांच्या आजी आजोबांशी चांगले संबंध ठेवतात.**




आणि त्यांच्या बिनशर्त प्रेम आणि उदारपणामुळे एकत्र आनंद घेत असलेल्या दर्जेदार वेळेमुळे त्यांच्याकडे पाहतात. आजी आजोबा म्हणजे घरातील अडगळ नसून घराचा संस्काररूपी कळस,आधार वड आहेत. हा संस्कार देण्यासाठीच आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शाळेतील कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे स्वागत, दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक श्री शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी आजचा विद्यार्थी आणि पालक याविषयी महत्वपूर्ण विवेचन केले. उपस्थित सर्व मान्यवरांना यथोचित मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ डॉक्टर अजित जगताप यांनी आपली संस्कृती,आपल्या संस्कृतीमध्ये आजी-आजोबांचे स्थान, मार्गशीर्ष महिन्याची पवित्रता, आपले सण आणि संस्कार याविषयी अत्यंत मौलिक शब्दात मार्गदर्शन केले. जीवन शिक्षण मंदिर या तीन शब्दांचा अर्थ समजावून सांगितला.

यानंतर शाळेतील शिक्षकांनी आजी-आजोबांसाठी विविध खेळ उपयोजित केले होते.अनेक आजी-आजोबांनी यात सक्रिय सहभाग घेतला. गाणी म्हणून नृत्य करून आजी-आजोबांनी आजच्या कार्यक्रमाचा आनंद लुटला. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### कृतज्ञतापूर्वक भावना व्यक्त केल्या

कार्यक्रम साजरा होत असताना अनेकांनी सेल्फी पॉईंटमध्ये जाऊन आपल्या नातवंडांसोबत सेल्फी सुद्धा घेतले. आजच्या कार्यक्रमाबद्दल अनेकांनी आपल्या कृतज्ञतापूर्वक भावना व्यक्त केल्या. उषा पांडे या पालकांनी शाळेच्या संस्कारक्षम कार्यक्रमाविषयी तोंड भरून कौतुक केले. शिक्षक, पालक प्रतिनिधी म्हणून अजित लक्ष्मणराव मेदनकर, अनिता गव्हाणे, अरुणा कुंभार, रेणुका नाईक, जाहिदा मोकाशी, गायत्री देवकर, सारिका पालवे, आरती लांडगे, मेघा पाटील, सविता दाते, मुग्धा कांबळे आदी उपस्थित होते.

## ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’

# यंदा महा कुंभमेळ्याला समर्पित!

### भक्ती-संस्कृती-परंपरा” थीमद्वारे देणार पर्यावरण रक्षणाचा संदेश

#### भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची माहिती




**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**गेल्या ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये नोंद झालेली आणि इंद्रायणी नदी स्वच्छता अन् संवर्धनाबाबतचा संदेश देणारी ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ यंदा महा कुंभमेळ्याला समर्पित केली असल्याचे भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या पुढाकाराने आणि अविरत श्रमदान, सायकल मित्र-पुणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्यासह विविध पर्यावरण प्रेमी संस्था, संघटना आणि स्वयंसेवीवृत्तीने काम करणारे मान्यवर या सर्वांच्या पुढाकारातून ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’चे आयोजन करण्यात येते. भोसरीतील गाव जत्रा मैदानावर येत्या रविवारी, दि. 19 जानेवारी रोजी सकाळी 6 वाजता या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे आणि युवा पिढीमध्ये सायकलिंग व नियमित व्यायाम याबाबत जनजागृती करणे. या उद्देशाने 2017 पासून आम्ही प्रतिवर्षी ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ आयोजित करीत आहोत. सायक्लोथॉंचे यंदा 9 वे वर्ष आहे. श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू अशा तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी नदीबाबत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामध्ये विषेश महत्त्व आहे. नदी प्रदूषणामुळे इंद्रायणीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशा पवित्र इंद्रायणीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. ‘रिव्हर सायक्लोथॉन’च्या आयोजनासाठी पुढाकार घेतात. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील सुमारे 35 हजार सायकलपटू युवक-युवती आणि अबालवृद्ध सायकल रॅलीमध्ये सहभागी होतात. गतवर्षी रिव्हर सायक्लोथॉनची 2022 मध्ये ‘ गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये नोंद झाली आहे. ‘सायकलची सर्वात मोठी रांग’ हे रेकॉर्ड, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंदवण्यात आले, ही बाब तमाम पिंपरी-चिंचवडकर आणि पर्यावरणप्रेमींसाठी निश्चितच अभिमानाची आहे. हा अभिमान जपण्यासाठी सोबतच शहराच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी चळवळ नागरिकांच्या मनातून निर्माण करणे आवश्यक आहे हाच उदात्त हेतू ठेवून प्रतिवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते.

तसेच, ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’मध्ये पर्यावरण प्रेमी, सायकलपटू आणि सर्वसामान्य नागरिकांना सहज सहभागी होता यावे. या करिता https://rivercyclothon.in/ हे संकेतस्थळ निर्माण केले आहे. याद्वारे ऑनलाईन पद्धतीने नागरिकांनी सायक्लोथॉनसाठी नोंदणी करावी. सायक्लोथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. त्यामुळे यावर्षी विक्रमी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले आहे.

> “ भारतीयांचे श्रद्धास्थान प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे महाकुंभ मेळा सुरु आहे. १२ वर्षांनंतर होणारा हा जगातील सर्वात मोठा अध्यात्मिक सोहळा आहे. त्यामुळे यावर्षीची ‘इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन’ कुंभमेळ्याला समर्पित केली आहे. “भक्ती-संस्कृती-परंपरा” अशी थीम आहे. नदी स्वच्छता, पर्यावरण रक्षण असा उदात्त हेतू ठेवून आयोजित केलेल्या या उपक्रमासाठी जास्तीत जास्त सहभाग द्यावा. पर्यावरण संवर्धनाची चळवळ प्रत्येकाच्या मनात जागृत व्हावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा. भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## ‘एमआयडीसीतील समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढू’

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन; लवकरच बैठकीचे आयोजन

**। पिंपरी ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेने शहरातील उद्योगजगताला सामोरे जावे लागणाऱ्या विविध समस्यांचे गाऱ्हाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडले. याबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी लवकरच एक बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.**



लघुउद्योग संघटनेच्या शिष्टमंडळाने पुणे येथे मुख्यमंत्र्यांची नुकतीच भेट घेतली. त्या प्रसंगी पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, संचालक संजय सातव, अतुल इनामदार, स्वीकृत संचालक रामदास जैद आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, पोलीस विभाग, महावितरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आदी आस्थापनांचे संबंधित अधिकारी तसेच पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना यांची एक संयुक्त बैठक घेतली जाईल. त्या माध्यमातून उद्योजकांच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी लवकरात लवकर कामे चालू केली जातील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला दिले. औद्योगिक पट्ट्यात जाणवणाऱ्या विविध समस्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. त्यामध्ये विविध मागण्या मांडण्यात आल्या. उद्योजकांना एलबीटीची बाकी नसलेली रक्कम व्याज व शास्ती दंडासह भरण्याच्या नोटीस पाठवलेल्या आहेत. त्यामुळे अगोदरच मेटाकुटीला आलेला उद्योजक हा आता पूर्णपणे नेस्तनाबूत होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. निवासी भागातील लघुउद्योगांचे औद्योगिक परिसरात पुनर्वसन करण्यासाठी पालिकेने एमआयडीसीकडून १९९२ मध्ये टी-२०१ हा भूखंड घेतला होता. त्यावर प्रकल्पाचे कामदेखील सुरू केले. २५ वर्षांनंतर हा प्रकल्प बऱ्यापैकी पूर्ण झाला आहे.

#### घातक कचऱ्याची महापालिकेने विल्हेवाट लावावी

तसेच उद्योजकांना व्यापारी दराने आकारले जाणारे पाण्याचे बिल औद्योगिक दराने आकारावे. तसेच पाणीपट्टी दर कमी करावा. ज्या औद्योगिक परिसरात कचरा उचलण्यासाठी वाहने जात नाहीत. त्या ठिकाणी महापालिकेने कचरा उचलण्यासाठी वाहने उपलब्ध करून द्यावी. औद्योगिक घातक कचरा गोळा केल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्याची सोय आणि जबाबदारीदेखील महानगरपालिकेने उचलावी, अशा विविध समस्या उद्योजकांनी मांडल्या.

# ‘इंडी’ आघाडी संपली, महा ‘बिघाडी’त झुंपली !



**‘स्टेट’मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

**लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि त्यांच्या मित्र पक्षांना मिळालेला कौल पाहता, आता पाच वर्षे काहीच उद्योग नाही, असे समजून केंद्रात ‘इंडी’ आघाडी आणि महाराष्ट्रात महाविकास आघाडीने आपले चंबूगबाळे गुंडाळण्याचे ठरवले आहे. केंद्रातली आघाडी तर संपली आहे, आणि महाराष्ट्रातल्या महाविकास आघाडीमध्ये झुंपली आहे, हे महत्त्वाचे ! केंद्रातील इंडी आघाडीतून एक एक पक्ष बाहेर पडत चालले आहेत आणि बहुतेकांनी काँग्रेसवर अपयशाबद्दल आरोप केले आहेत.**

अरविंद केजरीवाल यांचा ‘आप’ त्याचप्रमाणे ममता बॅनर्जी आणि लालूप्रसाद यादव यांच्या पक्षांनीही या आघाडी पासून दूर राहण्यास प्राधान्य दिले आहे, तसे सुनावले असून पावलेही टाकली आहेत.

## उबाठा गटाची भंबेरी!

महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त खळबळ उडाली आहे, ती शिवसेनेच्या उबाठा गटात ! त्यांना अपेक्षेएवढ्या जागा तर मिळाल्याच नाहीत, उलट त्यांचा सुपडा साफ झाला आहे. निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटावर बेछूट आरोप करत सुटलेला उबाठा गट आत्मविश्वासासह सर्वस्व गमावून बसला आहे. त्यातून मग कधी आपल्या मित्र पक्षांवर जीवघेणी टीका, एकला चलो रे चा नारा किंवा कधी कधी काँग्रेसच्या माथ्यावर अपयशाचे खापर फोडणे असे प्रकार त्यांनी सुरू केले आहेत.

एकूण काय, भारतीय जनता पार्टीने केंद्रात आणि राज्यात विरोधकांना काहीच काम ठेवलेले नाही. भाजपा करीत असलेली कामे पाहा आणि बिनधास्त टीका करत बसा, सभागृहात विरोधी पक्षांची बाके



बडवत बसा, एवढे एकच काम केंद्रात आणि राज्यात आघाडीसाठी शिल्लक ठेवले आहे, यात पाच वर्षे बदल होणार नाही, हे देखील त्यांना ठासून सांगितले आहे.

## सहा महिन्यात निवडणुकांची शक्यता

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक या सहा महिन्यात होईल, असे दिसत आहे. किंबहुना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसे संकेत दिले आहेत. विधानसभा निवडणुकीत ‘महायुती’ ला भरघोस यश मिळाले. जनतेने मनोमन ‘महायुती’ चे वर्चस्व मानले आहे. गेल्या अडीच वर्षांपूर्वीचे फोडाफोडीचे राजकारण आणि त्यामुळे जनमानसात निर्माण झालेली नैराश्याची भावना दूर गेली आहे. त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका, पंचायती, जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सहा महिन्यात होतील,असा अंदाज आहे. म्हणूनच, शहरातील किंवा जिल्ह्याच्या ठिकाणच्या मिनी मंत्रालयाच्या या निवडणुकीसाठी सगळेच जण जय्यत तयारीत आहेत.

या स्थानिक स्वराज्य संस्थेत सर्वाधिक महत्त्वाची आणि चर्चेची निवडणूक ठरणार आहे ती मुंबई महापालिकेची !

## मुंबई पालिकेसाठी खटाटोप

मुंबई कोणाची, हे वारंवार दाखवून देण्यासाठी मुंबई महापालिका ताब्यात असणे, हे सर्वार्थाने महत्त्वाचे आहे. मुंबई महापालिकेची व्याप्ती, अधिकार आणि आर्थिक विस्तार पाहता ही महापालिका म्हणजे राजकारण्यांना राज्य सरकारच्या बरोबरीचे वाटणे स्वाभाविक आहे. देशातील अनेक राज्यांच्या अंदाजपत्रकाचाएवढे अंदाजपत्रक एकट्या मुंबईचे असते, हे लक्षात घ्यायला हवे. महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सर्व पक्षांचे फासे कसे पडणार हेही पाहणे मनोरंजक ठरणार आहे. ताकदवान बनलेली महायुती आणि विस्कटलेली महाआघाडी यांची उमेदवार पेरणी कशी होते, हे महत्त्वाचे आहे. स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या गर्जना केल्या जात आहेत. स्वबळाच्या या आरडाओरड्याची पार्श्वभूमी बघायला हवी. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला शिवसेनेच्या उबाठा गटाचा लाभ झाला आणि विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस सोबत असल्यामुळे ठाकरे गटाला दारुण पराभव पत्करावा लागला, असा समज उबाठा गटाचा आहे, काँग्रेसवरचा राग त्यासाठीच आहे.

विश्वास गमावलेल्या महाविकास आघाडीत राहून उबाठा कार्यकर्त्यांचा, मतांचा केवळ वापर केला जात आहे, अशी भावना या गटात तयार झाली आहे. त्यामुळे एकटे लढले असतो, तर अधिक जागा मिळाल्या असत्या, असे स्वतः उद्धव ठाकरे किंवा त्यांच्या गटाचे नेते अनेक नेते बोलून दाखवतात. तिकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून काँग्रेसचे कंबरडे मोडले, त्यातून काँग्रेस उभी राहू शकत नाही, असे वक्तव्य केले जात आहे. तीनपैकी दोन पक्षांकडून टोकाची टीका होत असतानाच काँग्रेस मात्र आपली थंडपणाची भूमिका सोडत नाही. महाविकास आघाडीची शकले महानगरपालिका निवडणुकीपूर्वी झालेली दिसणार, हे नक्की आहे.

## केंद्रात ‘इंडी’ आघाडीत प्रचंड मतभेद !

आता इंडिया आघाडीकडे पाहू. भाजपाचा चौखूर उधळणारा वारू रोखण्यासाठी भाजपा विरोधकांनी एकत्र येत, गाजावाजा करत इंडिया आघाडीची स्थापना केली होती, आठवतं का ? अर्थात, राजकीय स्वार्थासाठी ही मंडळी एकत्र आली होती, हे सर्वांनाच कळलं होतं. विचारांमध्ये एकवाक्यता, ध्येयधोरणे विभिन्न असतानाही केवळ भाजपाविरोध या एकमेव विचाराने ही मंडळी एकत्र आली होती. यात प्रत्येकजण एकेकाळी आपापल्या राज्यात मातब्बर होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही आपला टिकाव लागणे शक्य नसल्याने लोकसभा निवडणुकीसाठी ही सर्व मंडळी एकत्र आली व त्यातूनच इंडिया आघाडी देशाच्या राजकारणात जन्माला आली, पण सर्वांची वेगवेगळी तत्वे आणि वेगवेगळ्या दिशेला तोंडे, त्यातून नेतृत्व कोणी करायचे हा वाद, या कारणांमुळे इंडी आघाडीला घरघर लागली, आणि तिची छकले उडाली हे सत्य आहे!लोकसभा निवडणूक एकत्र लढणे व भाजपाला सत्ता मिळवू न देणे हा एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी ही आघाडी कार्यरत झाली. मुळातच इंडिया आघाडीच्या वाटचालीला स्थापनेपूर्वीपासूनच ग्रहण लागले होते. ज्यांच्या संकल्पनेतून इंडिया आघाडी जन्माला आली, ते नितीशकुमारच लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच काही महिने भाजपामध्ये सामील झाले, कर्णधारच मालिका सुरू होण्यापूर्वी प्रतिस्पर्धी संघाचा स्टार फलंदाज अथवा गोलंदाज बनावा, तशीच परिस्थिती नितीशकुमारांच्या भूमिकेमुळे इंडिया आघाडीची झाली. नितीशकुमार यांनी इंडी आघाडीचा फार चुथडा केला आणि त्यांचा स्वप्नभंग ही करून टाकला. एकूण काय भारतीय जनता पार्टीला हवे तसे फासे पडत आहेत आणि राजकीय सारीपाट खेळण्यात भाजपा तरबेज आहे, हे सांगायला ज्योतिषाची मुळीच गरज नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# स्वराज्य संस्थांवर महायुतीचे लक्ष!

## आयुक्तांच्या निवडीचे सर्वाधिकार देवेंद्र फडणवीसांना

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबईत आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्य निवडणूक आयुक्त पदाच्या उमेदवाराची शिफारस करण्याचे सर्वाधिकार देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. याबाबतची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. यापूर्वी, राज्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळाला राज्य निवडणूक आयुक्त पदासाठी मुख्यमंत्र्यांकडे नावाची शिफारस करण्याचे अधिकार होते, त्यानंतर मुख्यमंत्री ते नाव राज्यपालांकडे पाठवायचे. पण मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे आता मुख्यमंत्री राज्यपालांना थेट उमेदवाराची शिफरस करतील.**

राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांवर सध्या प्रशासक आहेत. तसेच येत्या काही महिन्यांत या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयाला महत्व प्राप्त झाले आहे. दरम्यान राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाद्वारे घेण्यात येतात. विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळविल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या महायुतीने आता स्थानिक स्वराज्य संस्थांवर लक्ष केंद्रीत केले आहे. पावसाळ्यापूर्वी या निवडणुका घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी या निवडणुका घेण्याची जबाबदारी असलेल्या राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावाच्या शिफारशीबाबत आजची मंत्रिमंडळाची बैठक बोलविण्यात आली होती. राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान सप्टेंबरमध्ये निवृत्त झाल्यापासून हे पद रिक्त असून, नव्या आयुक्तांची निवड गेल्या काही महिन्यांपासून रखडली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीची प्रक्रिया सरकारने राबविली. दरम्यान, आयुक्तपदासाठी माजी मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई पोर्ट ट्रस्टचे(बीपीटी) माजी अध्यक्ष राजीव जलोटा, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांच्यासह डझनभर सनदी अधिकारी इच्छुक आहेत. आज मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांपैकी दुसरा निर्णय कागल तालुक्यातील सरकारी होमिओपॅथी महाविद्यालयाबाबतचा आहे.



मंत्रिमंडळाने कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील सांगाव येथे होणारे सरकारी होमिओपॅथी महाविद्यालय आणि रुग्णालय पिंपळगाव खुर्द येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबर यासाठी जमीन हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान ऑक्टोबर २०२४ मध्ये गेल्या सरकारच्या कार्यकाळात कागल तालुक्यातील सांगाव येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे सरकारी होमिओपॅथी महाविद्यालय आणि ५० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांवर सध्या प्रशासक आहेत. तसेच येत्या काही महिन्यांत या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयाला महत्व प्राप्त झाले आहे. दरम्यान राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाद्वारे घेण्यात येतात.विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळविल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या महायुतीने आता स्थानिक स्वराज्य संस्थांवर लक्ष केंद्रीत केले आहे. पावसाळ्यापूर्वी या निवडणुका घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी या निवडणुका घेण्याची जबाबदारी असलेल्या राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावाच्या शिफारशीबाबत आजची मंत्रिमंडळाची बैठक बोलविण्यात आली होती. राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान

### डझनभर सनदी अधिकारी इच्छुक

यासाठी जमीन हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान ऑक्टोबर २०२४ मध्ये गेल्या सरकारच्या कार्यकाळात कागल तालुक्यातील सांगाव येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे सरकारी होमिओपॅथी महाविद्यालय आणि ५० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. याच्या जागेत आता बदल करण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान सप्टेंबरमध्ये निवृत्त झाल्यापासून हे पद रिक्त असून, नव्या आयुक्तांची निवड गेल्या काही महिन्यांपासून रखडली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीची प्रक्रिया सरकारने राबविली. दरम्यान, आयुक्तपदासाठी माजी मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई पोर्ट ट्रस्टचे(बीपीटी) माजी अध्यक्ष राजीव जलोटा, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांच्यासह डझनभर सनदी अधिकारी इच्छुक आहेत. आज मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांपैकी दुसरा निर्णय कागल तालुक्यातील सरकारी होमिओपॅथी महाविद्यालयाबाबतचा आहे.

सप्टेंबरमध्ये निवृत्त झाल्यापासून हे पद रिक्त असून, नव्या आयुक्तांची निवड गेल्या काही महिन्यांपासून रखडली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीची प्रक्रिया सरकारने राबविली. दरम्यान, आयुक्तपदासाठी माजी मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई पोर्ट ट्रस्टचे(बीपीटी) माजी अध्यक्ष राजीव जलोटा, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांच्यासह डझनभर सनदी अधिकारी इच्छुक आहेत. आज मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांपैकी दुसरा निर्णय कागल तालुक्यातील सरकारी होमिओपॅथी महाविद्यालयाबाबतचा आहे. मंत्रिमंडळाने कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील सांगाव येथे होणारे सरकारी होमिओपॅथी महाविद्यालय आणि रुग्णालय पिंपळगाव खुर्द येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे.

# 150 हून अधिक कावळ्यांचा रहस्यमयरित्या मृत्यू !

## 6 कावळ्यांवर पशू चिकीत्सालयात उपचार करण्यात येत आहेत

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लातूरमधील उदगीर शहरात मागील दोन दिवसांपासून एक फारच विचित्र प्रकार घडत आहे. उदगीर शहरांमध्ये मागील दोन दिवसांमध्ये 150 हून अधिक कावळ्यांचा रहस्यमयरित्या मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये घबराट पसरल्याचं पाहायला मिळत आहे. उदगीर शहरातील तीन ठिकाणी कावळ्यांच्या मृत्यूचा प्रकार घडला आहे.**



शहरातील महात्मा गांधी उद्यान, हुतात्मा स्मारक परिसर आणि शहर पोलीस ठाण्याचा आवारात मोठ्या संख्येनं कावळ्यांचे अस्तित्व आहे. मात्र मागील दोन दिवसांपासून अनेक कावळे झाडांच्या खाली मृतावस्थेत पडलेले आढळून येत आहेत. सुरुवातीला याकडे कोणी फारसं लक्ष दिलं नाही. मात्र सलग दुसऱ्या दिवशीही असेच कावळे मृतावस्थेत आढळून आल्याने अनेकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यामुळे लातूरमधील पशु वैद्यकीय विभाग आता सतर्क झाला आहे. या कावळ्यांचे मृतदेह पशु विभागाकडून गोळा करण्यात आले आहेत. जवळपास दिडशेहून अधिक कावळ्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. हे कावळे मृत्यूमुखी पडण्याची पद्धत फारच विचित्र आहे. आधी दोन्ही पायावर बसलेल्या कावळ्यांची मान अचानक वाकडी होते. सुसुत्रता गमावल्याप्रमाणे आणि तोल गेल्याने एखादी व्यक्ती झाडावरुन खाली पडते तसे हे कावळे झाडांच्या फांद्यावरुन जमिनीवर कोसळतात. अशा पध्दतीने कावळ्यांचा मृत्यू होत असल्याचे प्रकार उदगीर शहरातील तीन

### तपासणीसाठी पाठवण्यात आले नमुने

मृत कावळ्यांच्या रक्ताचे नमुने पुणे व भोपाळ येथील पशुरोग अन्वेषण विभागाच्या प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत, अशी माहिती तहसीलदार राम बोरगावकर यांनी दिली आहे. आता या अहवालामधून काय माहिती समोर येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.पोलीस ठाण्याचा आवारात मोठ्या संख्येनं कावळ्यांचे अस्तित्व आहे. मात्र मागील दोन दिवसांपासून अनेक कावळे झाडांच्या खाली मृतावस्थेत पडलेले आढळून येत आहेत. सुरुवातीला याकडे कोणी फारसं लक्ष दिलं नाही. मात्र सलग दुसऱ्या दिवशीही असेच कावळे मृतावस्थेत आढळून आल्याने अनेकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यामुळे लातूरमधील पशु वैद्यकीय विभाग आता सतर्क झाला आहे.

ते चार ठिकाणी घडले आहेत. एकंदरित या कावळ्यांच्या मृत्यूचा आकडा हा दिडशेहून अधिक असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या विचित्र विषाणूचा संसर्ग झालेल्या 6 कावळ्यांवर उदगीरच्या पशू चिकीत्सालयात उपचार करण्यात येत आहेत.

# 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी!

## सरकारने कर्मचाऱ्यांना एक प्रकारचे मोठे गिफ्टच दिले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशातील केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. 8 व्या वेतन आयोगाला केंद्र सरकारने मंजूरी दिली आहे. केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारक 8 व्या वेतन आयोगाची गेल्या कित्येक दिवसांपासून वाट पाहत होते आणि सरकारने अखेर 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण बघायला मिळतंय. सरकारी कर्मचाऱ्यांकडून सतत 8 व्या वेतन आयोगाला मंजुर करण्याची मागणी ही केली जात होती.**



मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी 8 व्या वेतन आयोगासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आधीच्या वेतन आयोगाची समिती 7 व्या वेतन आयोगासाठी 2016 मध्ये स्थापन करण्यात आली. 2026 पासून 8 व्या वेतन आयोगावर काम सुरु होणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी देण्यात आली. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी कॅबिनेट सचिवांची भेट घेऊन 8 वा वेतन आयोग स्थापन करण्याची मागणी केली होती आणि या संघटनांकडून 8 वा वेतन आयोग स्थापन करण्यासाठी सरकारवर दबाव आणला जात होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 व्या वेतन आयोगाला मंजूरी दिली आहे. 7 व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ आता 2026 पर्यंत राहील. यानंतर आठव्या वेतन आयोगाची समिती तयार होईल. 8 वा वेतन आयोग मिळणार की नाही, यावर शंका उपस्थित केली जात असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. 7 वा वेतन आयोगाच्या समितीचा कार्यकाळ संपल्यानंतर आठव्या वेतनच्या समितीला मंजूरी देण्यात येईल, असे आधीपासून म्हटले जात होते. 8 व्या आयोगाचे गठन होण्यासोबत पगारवाढदेखील होईल. पण आता केव्हापर्यंत लागू होईल, याची कोणतीही डेडलाईन नाही.

आठव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष आणि 2 सदस्यांच्या नावाची लवकरच घोषणा केली जाणार आहे. वेतन आयोग दहा वर्षांनी लागू होत असल्याने नरेंद्र मोदी सरकार 1 जानेवारी 2026 पासून 8 वा वेतन आयोग लागू करेल, अशी माहिती मिळत आहे. 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी देऊन मोदी सरकारने कर्मचाऱ्यांना एक प्रकारचे अत्यंत मोठे गिफ्टच दिले आहे. 28 फेब्रुवारी 2014 रोजी सातव्या वेतन आयोगाची स्थापना करण्यात आली होती. दीड वर्षांनंतर नोव्हेंबर 2015 मध्ये केंद्र सरकारला सादर केल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी देण्यात आली. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी कॅबिनेट सचिवांची भेट घेऊन 8 वा वेतन आयोग स्थापन करण्याची मागणी केली होती आणि या संघटनांकडून 8 वा वेतन आयोग स्थापन करण्यासाठी सरकारवर दबाव आणला जात होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 व्या वेतन आयोगाला मंजूरी दिली आहे. 7 व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ आता 2026 पर्यंत राहील. यानंतर आठव्या वेतन आयोगाची समिती तयार होईल. 8 वा वेतन आयोग मिळणार की नाही, यावर शंका उपस्थित केली जात असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. 7 वा वेतन आयोगाच्या समितीचा कार्यकाळ संपल्यानंतर आठव्या वेतनच्या समितीला मंजूरी देण्यात येईल, असे आधीपासून म्हटले जात होते.

### 2026 पासून 8 वा वेतन आयोग लागू

8 व्या आयोगाचे गठन होण्यासोबत पगारवाढदेखील होईल. पण आता केव्हापर्यंत लागू होईल, याची कोणतीही डेडलाईन नाही. आठव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष आणि 2 सदस्यांच्या नावाची लवकरच घोषणा केली जाणार आहे. वेतन आयोग दहा वर्षांनी लागू होत असल्याने नरेंद्र मोदी सरकार 1 जानेवारी 2026 पासून 8 वा वेतन आयोग लागू करेल, अशी माहिती मिळत आहे. 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी देऊन मोदी सरकारने कर्मचाऱ्यांना एक प्रकारचे अत्यंत मोठे गिफ्टच दिले आहे. 28 फेब्रुवारी 2014 रोजी सातव्या वेतन आयोगाची स्थापना करण्यात आली होती. दीड वर्षांनंतर नोव्हेंबर 2015 मध्ये केंद्र सरकारला सादर केल्या.देशातील केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. 8 व्या वेतन आयोगाला केंद्र सरकारने मंजूरी दिली आहे. केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारक 8 व्या वेतन आयोगाची गेल्या कित्येक दिवसांपासून वाट पाहत होते आणि सरकारने अखेर 8 व्या वेतन आयोगाला मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण बघायला मिळतंय. सरकारी कर्मचाऱ्यांकडून सतत 8 व्या वेतन आयोगाला मंजुर करण्याची मागणी ही केली जात होती.

# कितने गाझी आये, कितने गाझी गये

## हिंडनबर्ग बंद करण्याची घोषणा; आदाणी समूहाचा टोला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हिंडनबर्ग रिसर्चचे संस्थापक नॅथन अँडरसन यांनी कंपनी बंद करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यानंतर अदाणी समूहाचे मुख्य आर्थिक अधिकारी जुगेशिंदर रॉबी सिंग यांनी एका पोस्टच्या माध्यमातून हिंडनबर्गला टोला लगावला आहे.**

एक्सवर केलेल्या एका ओळीच्या पोस्टमध्ये जुगेशिंदर रॉबी सिंग यांनी, "कितने गाझी आये, कितने गाझी गये", इतकेच लिहित हिंडनबर्गला लक्ष्य केले आहे. हिंडेनबर्ग रिसर्चचे संस्थापक नॅथन अँडरसन यांनी कंपनी अधिकृतपणे बंद करत असल्याची घोषणा केल्यानंतर सिंग यांनी ही पोस्ट केल्याने ती, सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यावर अनेक युजर्स आता प्रतिक्रियाही देऊ लागले आहेत. २०२३ मध्ये हिंडनबर्गने जाहीर केलेल्या आहवालामुळे अदाणी समूहाला अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले होते.हिंडेनबर्ग रिसर्चने २०२३ मध्ये अदाणी समूहाला वारंवार लक्ष्य केले होते. आपल्या अहवालातून हिंडेनबर्गने केलेल्या आरोपांमुळे गौतम अदाणी यांना मोठे नुकसान सोसावे लागले होते. या आरोपांमुळे अदाणी




समूहाच्या बाजार मूल्यात मोठी घसरण झाली होती. असे असले तरी नंतर अदाणी समूहने शेअर बाजारातील त्यांचा तोटा भरून काढला होता. तसेच याबाबत अदाणी समूहाला अनेक आरोपांचा सामना करावा लागला होता. असे असले तरी, गौतम अदाणी आणि त्यांच्या कंपन्यांनी हिंडेनबर्गने केलेले सर्व आरोप सातत्याने फेटाळून लावले आहेत.हिंडनबर्ग रिसर्चचे संस्थापक नॅथन अँडरसन यांनी आज एक्सवर एक पोस्ट लिहून कंपनी बंद करत असल्याची माहिती दिली होती. या पोस्टमध्ये नॅथन अँडरसन यांनी म्हटले होते की,"आम्ही जे काही ठरवले होते ते पूर्ण झाल्याने आता आम्ही कंपनी बंद करत आहेत."

नॅथन अँडरसन यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले की,"भ्रष्टाचार, खोटेपणा, गैरव्यवहार यावर आम्ही पुराव्यांसह प्रहार केले. आम्ही असे लढे दिले आहेत जे कोणत्याही व्यक्ती किंवा साम्राज्यापेक्षा मोठे आहेत.

### कंपनी बंद करण्याचा निर्णय

लबाडी, भ्रष्टाचार, नकारात्मकता याचा सुरुवातीचा परिणाम हा प्रभावीच वाटतो, पण सत्याची वाट आम्ही सोडली नाही, त्यामुळे ही वाटचाल करु शकलो. तसेच आम्ही काही साम्राज्यांना धक्के देण्याचे कामही केले आहे. आम्ही केलेल्या या कामामुळे किमान १०० व्यक्तींच्या विरोधात दिवाणी खटले दाखल झाले आहेत. ज्यामध्ये काही अब्जाधीश आणि उच्चभ्रूंचा समावेश आहे. हिंडनबर्ग रिसर्चचे संस्थापक नॅथन अँडरसन यांनी कंपनी बंद करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

# कुंद्राच्या एक्स पत्नीने केला शिल्पावर गंभीर आरोप



बॉलिवूडमधील पॉवरफूल कपल म्हणून अभिनेत्री शिल्पा शेट्टी (SHILPA SHETTY) आणि राज कुंद्रा (RAJ KUNDRA) यांच्याकडे पाहिलं जातं. कितीही अडीअडचणी आल्या तरी सुद्धा ही जोडी एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी रहात असल्याचं दिसून येतं. राजचं हे दुसरं लग्न असून शिल्पा पूर्वी त्याने कवितासोबत लग्न केलं होतं. मात्र, कविताला घटस्फोट देत त्याने शिल्पासोबत दुसरा संसार थाटला. परंतु, या लग्नामुळे कविता नाराज झाली होती. इतकंच नाही तर तिने शिल्पावर तिच्या संसार मोडल्याचा आरोपही केला होता.शिल्पा आणि राज या जोडीने २००९ मध्ये लग्नगाठ बांधली. या लग्नानंतर कविताने राज आणि शिल्पावर अनेक गंभीर आरोप केले होते. कविताने डेली मेलला एक मुलाखत दिली होती. या मुलाखतीमध्ये तिने शिल्पावर टीकास्त्र डागलं होतं. जेव्हा मी राजबरोबर गप्पा मारायचे त्यावेळी तो कायम शिल्पाबद्दलच बोलायचा. त्यामुळे त्याला माझ्यापेक्षा नक्कीच कोणीतरी चांगली व्यक्ती भेटलीये हे कळलं होतं", असं कविताने मुलाखतीमध्ये म्हटलं होतं. सोबतच 'शिल्पामुळे माझा संसार मोडला', असंही ती म्हणाली होती. कविताच्या या वक्तव्यावर शिल्पानेही तिच्याच शब्दांत उत्तर दिलं. शिल्पाने 'हॅलो मॅगझी'नला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिने कविताने केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली आहे. "मी राजला स्पष्टपणे ताकीद दिली होती की जोपर्यंत तो घटस्फोट घेत नाही तोपर्यंत मी त्याच्याशी लग्न करणार नाही. आपल्यात फक्त मैत्री राहील. मी कधीच कोणाचं घर, संसार मोडला नाही. माझ्यासाठी हे शब्द वापरणं खूप चुकीचं आहे. या सगळ्या गोष्टीचा माझ्या आई-वडिलांना त्रास झाला होता.

# सोनारीकावर गुन्हा दाखल !

काही दिवसांपुर्वी बालकलाकार साईशा भोईरची आई पूजा भोईला आर्थिक फसवणुक केली म्हणुन अटक करण्यात आली. आता आणखी एका अभिनेत्रीने एका व्यक्तीची फसवणुक केल्याचा आरोप करण्यात आलाय. ही अभिनेत्री म्हणजे सोनारीका भदोरिया. सोनारीका भदोरिया हिने देवो के देव या लोकप्रिय टीव्ही मालिकेत अभिनय केलाय. सोनारीकाविरुद्ध आर्थिक फसवणुक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. सोनारिका भदोरिया ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सोनारिकाने आजवर अनेक हिंदी मालिकांमध्ये लोकप्रिय भुमिका साकारल्या आहेत. सोनारिका विरोधात माहिम येथील शाहू नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलीय. सोनारिका तिच्या इंन्स्टाग्राम स्टोरीवर एक जाहिरात ठेवली होती. त्या जाहीरातीत पैशांची गुंतवणुक करुन खुप पैसे कमवा, असं सांगण्यात आलं होतं ही जाहीरात पाहून परमेश मैत्री नामक व्यक्तिने पैशांची गुंतवणुक केली. परंतु नंतर आपली फसवणुक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. म्हणुन त्याने पोलिस ठाण्यात अभिनेत्रीविरोधात तक्रार करुन गुन्हा नोंदवला आहे.

# घटनेचं कव्हरेज करणं टाळावं



अभिनेता सैफ अली खानवर गुरुवारी ( १६ जानेवारी ) रात्री वांद्रे येथील राहत्या घरात दरोडेखोराने चाकूने हल्ला केला. ही बातमी समोर येताच संपूर्ण बॉलीवूड विश्वात खळबळ उडाली. मध्यरात्री सैफला त्याचा मुलगा इब्राहिम अली खान आणि केअरटेकरने लीलावती रुग्णालयात दाखल केलं. सैफला रुग्णालयात दाखल केल्यावर डॉक्टरांनी तातडीने उपचारांना सुरुवात केली. यानंतर अभिनेत्यावर मोठी शस्त्रक्रिया पार पडली. यादरम्यान, सैफचे चाहते व कुटुंबीय प्रचंड चिंतेत होते. गुरुवारी दुपारी, सैफच्या टीमकडून तसेच लीलावती रुग्णालयातील डॉक्टरांनी अभिनेत्याच्या प्रकृतीबाबत अपडेट दिली. सैफवर शस्त्रक्रिया पूर्ण झाली असून, पुढील काही दिवस डॉक्टरांची टीम त्याच्या प्रकृतीकडे लक्ष ठेवेल आणि याप्रकरणी पोलीस पुढचा तपास करतील असं अभिनेत्याच्या टीमने सांगितलं. सबा पतौडी व्यतिरिक्त या घटनेबाबत कोणीही सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली नव्हती. आता नुकतीच करीना कपूर खानने या घटनेबाबत आपली पहिली प्रतिक्रिया इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत दिली आहे.करीना लिहिते, "हा आम्हा कुटुंबीयांसाठी प्रचंड आव्हानात्मक दिवस होता. गेल्या काही तासांमध्ये नेमकं काय घडलंय...या सगळ्याचा विचार आम्ही अजूनही करत आहोत. आमचं कुटुंब या कठीण काळातून जात असताना, मी मीडिया आणि पापाराझींना आदरपूर्वक आणि नम्रपणे विनंती करते की, त्यांनी सतत अनुमान काढणं आणि या घटनेचं कव्हरेज करणं टाळावं. या काळात तुम्ही दाखवलेल्या प्रेमाबद्दल आणि तुम्ही सर्वांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी निश्चितच आभारी आहे. एक कुटुंब म्हणून या घटनेतून बाहेर पडण्यासाठी आम्हाला काही वेळ द्या. या संवेदनशील काळात तुम्ही केलेल्या सहकार्याबद्दल मी तुमचे आभार मानू इच्छिते"दरम्यान, करीना कपूरने ही पोस्ट शेअर केल्यावर अनेक बॉलीवूड कलाकारांनी अभिनेत्रीला पाठिंबा देत,असं कमेंट सेक्शनमध्ये म्हटलं आहे. याशिवाय पूजा भट्ट, रवीना टंडन या अभिनेत्रींनी देखील सैफसाठी पोस्ट शेअर करत कलाकारांच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

# दरोडेखोराने 1 कोटी रुपये मागितले

अभिनेता सैफ अली खान व करीना कपूर खान यांच्या मुंबईतील घरी धक्कादायक घटना घडली. गुरुवारी मध्यरात्री एक दरोडेखोर त्यांच्या घरात शिरला. या दरोडेखोराने हल्ला केल्यामुळे सैफ अली खान व घरातील एक मदतनीस जखमी झाले. या दरोडेखोराचा फोटो पोलिसांनी प्रसिद्ध केला आहे. या दरोडेखोराबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. अभिनेता सैफ अली खानच्या वांद्रे येथील घरी गुरुवारी एक दरोडेखोर शिरला. त्याने घरातील मदतनीसला धमकी देऊन एक कोटी रुपयांची मागणी केली. हा गोंधळ ऐकून सैफ अली खान खोलीत धावला आणि हल्लेखोराशी झालेल्या झटापटीत तो जखमी झाला, अशी माहिती समोर आली आहे. मुंबईतील एका आलिशान इमारतीच्या १२ व्या मजल्यावरील सैफच्या अपार्टमेंटमध्ये रात्री उशिरा ही घटना घडली.पोलिसांनी नोंदवलेल्या जबाबानुसार, सैफ अली खानच्या घरातील मदतनीस महिलेला बाथरूमजवळ एक सावली दिसली. सुरुवातीला तिला वाटलं की करीना कपूर तिच्या धाकट्या मुलाला बघायला आली आहे, पण नंतर तिला संशय आला आणि ती चौकशीसाठी जवळ गेली.



# मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले : अंकिता लोखंडे

अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते.

# करुण नायरचं वादळ कायम!

## करुणने महाराष्ट्राच्या गोलंदाजांना दिवसा दाखवले तारे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विजय हजारे ट्रॉफीमध्ये एकामागून एक शतक झळकावणाऱ्या करूण नायरची बॅट सेमीफायनलमध्येही चांगलीच तळपली. महाराष्ट्रविरूद्धच्या सेमीफायनलमध्ये विदर्भाच्या फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करक धावांचा डोंगर उभारला. विदर्भने प्रथम फलंदाजी करताना ३ बाद ३८० धावा धावफलकावर जोडल्या. या सामन्यात करूण नायरने महाराष्ट्राच्या गोलंदाजांना सळो कि पळो करून सोडलं.**



करुण नायरने महाराष्ट्राविरुद्ध ४४ चेंडूत ८८ धावांची नाबाद खेळी केली. करुण नायर ज्या आक्रमक पद्धतीने फलंदाजी करत होता ते पाहता तो सलग पाचवे शतक झळकावेल असे वाटत होते पण तसं झालं नाही. तोपर्यंत संघाचा पहिला डाव संपला होता. करूणने अखेरच्या दोन षटकांत चौकार-षटकारांचा पाऊस पाडत ३६ धावा केल्या. तर विदर्भाचे सलामीवीर यश राठोड आणि ध्रुव शौरे हे दोघेही ३४.४ षटके खेळले आणि त्यांनी दणदणीत शतकं झळकावली. यानंतर कमी चेंडू मिळूनही करूणने झंझावाती अर्धशतक झळकावले आणि संघाने ३८० धावांपर्यंत मजल मारली. याशिवाय जितेश शर्माने देखील झटपट अर्धशतक झळकावत करूणला साथ दिली.डावाच्या शेवटच्या षटकात करुण नायरने वादळी फटकेबाजी केली. रजनीश गुरबानीने टाकलेल्या शेवटच्या षटकात करुणने एकूण २४ धावा दिल्या. विदर्भाच्या फलंदाजाने षटकाची सुरुवात जोरदार चौकार मारून केली. पुढच्या चेंडूवर एकही धाव न घेता करुणने तिसरा चेंडू थेट स्टेडिमयमध्ये पाठवला. षटकाच्या चौथ्या आणि पाचव्या चेंडूवरही तो शानदार चौकार मारण्यात यशस्वी ठरला. तर करुणने डावाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत संघाची धावसंख्या ३८० वर नेली.करुण नायर विजय हजारे ट्रॉफीमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. या खेळाडूने आतापर्यंत ७५२ धावा केल्या आहेत. मोठी गोष्ट म्हणजे या स्पर्धेत त्याने एकूण ५ शतकं झळकावली आहेत. गेल्या ७ डावात त्याने ७ वेळा पन्नास अधिक धावांचा आकडा गाठला. याशिवाय गेल्या ७ डावांमध्ये तो एकदाच बाद झाला आहे.करुण नायरने महाराष्ट्राविरुद्ध ४४ चेंडूत ८८ धावांची नाबाद खेळी केली. करुण नायर ज्या आक्रमक पद्धतीने फलंदाजी करत होता ते पाहता तो सलग पाचवे शतक झळकावेल असे वाटत होते पण तसं झालं नाही. तोपर्यंत संघाचा पहिला डाव संपला होता. करूणने अखेरच्या दोन षटकांत चौकार-षटकारांचा पाऊस पाडत ३६ धावा केल्या. तर विदर्भाचे सलामीवीर यश राठोड आणि ध्रुव शौरे हे दोघेही ३४.४ षटके खेळले आणि त्यांनी दणदणीत शतकं झळकावली. यानंतर कमी चेंडू मिळूनही करूणने झंझावाती अर्धशतक झळकावले आणि संघाने ३८० धावांपर्यंत मजल मारली. विदर्भाच्या फलंदाजाने षटकाची सुरुवात जोरदार चौकार मारून केली. पुढच्या चेंडूवर एकही धाव न घेता करुणने तिसरा चेंडू थेट स्टेडिमयमध्ये पाठवला. षटकाच्या चौथ्या आणि पाचव्या चेंडूवरही तो शानदार चौकार मारण्यात यशस्वी ठरला. तर करुणने डावाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत संघाची धावसंख्या ३८० वर नेली.करुण नायर विजय हजारे ट्रॉफीमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे.

### 44 चेंडूत 88 धावांची नाबाद खेळी

या खेळाडूने आतापर्यंत ७५२ धावा केल्या आहेत. मोठी गोष्ट म्हणजे या स्पर्धेत त्याने एकूण ५ शतकं झळकावली आहेत. गेल्या ७ डावात त्याने ७ वेळा पन्नास अधिक धावांचा आकडा गाठला. याशिवाय गेल्या ७ डावांमध्ये तो एकदाच बाद झाला आहे.विजय हजारे ट्रॉफीमध्ये एकामागून एक शतक झळकावणाऱ्या करूण नायरची बॅट सेमीफायनलमध्येही चांगलीच तळपली. महाराष्ट्रविरूद्धच्या सेमीफायनलमध्ये विदर्भाच्या फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करक धावांचा डोंगर उभारला. विदर्भने प्रथम फलंदाजी करताना ३ बाद ३८० धावा धावफलकावर जोडल्या. या सामन्यात करूण नायरने महाराष्ट्राच्या गोलंदाजांना सळो कि पळो करून सोडलं. करुण नायरने महाराष्ट्राविरुद्ध ४४ चेंडूत ८८ धावांची नाबाद खेळी केली. करुण नायर ज्या आक्रमक पद्धतीने फलंदाजी करत होता ते पाहता तो सलग पाचवे शतक झळकावेल असे वाटत होते पण तसं झालं नाही. तोपर्यंत संघाचा पहिला डाव संपला होता.

# भारतीय संघाला मिळाला नवा फलंदाजी प्रशिक्षक

## इंग्लंडविरुद्ध टी-20 मालिकेपूर्वी ताफ्यात होणार सामील

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी इंग्लंडविरूद्ध पांढ्या चेंडूची मालिका खेळणार आहे. येत्या २२ जानेवारीपासून टी-२० मालिकेला सुरूवात होणार आहे. या मालिकेत भारतीय संघात नवे फलंदाजी प्रशिक्षकही संघाबरोबर असणार आहेत. या मायदेशात होणाऱ्या मालिकेसाठी बीसीसीआयने नवे फलंदाजी प्रशिक्षक नेमले आहेत.**



सौराष्ट्राचे अष्टपैलू खेळाडू सितांशु कोटक यांची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून बीसीसीआयने निवड केली आहे. सितांशु कोटक यांनीही एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही, पण त्यांचा कोचिंगचा अनुभव चांगला आहे. भारताला इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळायची आहे.सूत्रांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, "सितांशू कोटक टीम इंडियात फलंदाजी प्रशिक्षक म्हणून सामील होणार आहेत. भारतीय संघाचे कोलकात्यात तीन दिवसीय शिबिर होणार असून त्यासाठी खेळाडू १८ तारखेपर्यंत तेथे पोहोचतील." भारतीय संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये सध्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, अभिषेक नायर (सहाय्यक प्रशिक्षक), रायन टेन डोशेट (सहाय्यक प्रशिक्षक), मोर्ने मॉर्केल (गोलंदाजी प्रशिक्षक) आणि टी दिलीप (क्षेत्ररक्षण प्रशिक्षक) आहेत.गुजरातमध्ये जन्मलेल्या कोटक यांनी आपल्या कारकिर्दीत एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. त्यांनी लिस्ट ए सामन्यांमध्ये ४२.३३ च्या सरासरीने ३०८३ धावा केल्या आहेत. क्रिकेट जगतात ते त्यांच्या उत्कृष्ट टेक्निकसाठी ओळखले जातात. १३० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्यांनी ४१.७७६ च्या सरासरीने ८०६१ धावा केल्या आहेत, ज्यात त्यांनी १५ शतकं झळकावली आहेत.कोटक यांच्या नावावर ९ टी-२० सामन्यात १३३ धावा आहेत. कोटक यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये ११ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. कोटक यांनी यापूर्वी इंडिया ए संघासह काम केलं आहे.

### कोण आहेत सितांशु कोटक?

या मालिकेत भारतीय संघात नवे फलंदाजी प्रशिक्षकही संघाबरोबर असणार आहेत. या मायदेशात होणाऱ्या मालिकेसाठी बीसीसीआयने नवे फलंदाजी प्रशिक्षक नेमले आहेत. सौराष्ट्राचे अष्टपैलू खेळाडू सितांशु कोटक यांची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून बीसीसीआयने निवड केली आहे. भारताला इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळायची आहे.सूत्रांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, "सितांशू कोटक टीम इंडियात फलंदाजी प्रशिक्षक म्हणून सामील होणार आहेत.